ePaper

**राहुल गांधींना सर्वोच्च न्यायालयाचा मोठा दिलासा; हायकोर्टातील सुनावणी स्थगित**



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | मंगळवार, दि. 18 ऑगस्ट 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!




पान 3 वरुन...

निगडीमध्ये सुपर स्पेशालिटी आरोग्यसेवेचा नवा अध्याय

## १४ राज्यांत विशेष मोहीम, २०० हून अधिक अटकेत..!

# दहशतवादी नेटवर्कचा सफाया.!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**स्वातंत्र्यदिनापूर्वी केंद्रीय सुरक्षा यंत्रणांनी मोठी कारवाई करत पाकिस्तानच्या गुप्तचर संस्था आयएसआयच्या कथित पाठबळावर कार्यरत असलेल्या 'शाहजाद भट्टी नेटवर्क'विरोधात देशव्यापी मोहीम राबवली. या कारवाईत देशविरोधी आणि घातपाती हल्ल्यांचा कट उधळण्यात यश आल्याची माहिती केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सोमवारी दिली. देशातील १४ राज्यांमध्ये समन्वयाने राबवलेल्या या मोहिमेत २०० हून अधिक संशयितांना अटक करण्यात आली.**

गृहमंत्री अमित शाह यांनी 'एक्स'वर माहिती देताना सांगितले की, मोदी सरकारने स्वातंत्र्यदिनापूर्वी आयएसआयचे कथित पाठबळ असलेल्या 'शाहजाद भट्टी नेटवर्क'चे मनसुबे उधळून लावले आहेत. दहशतवादाविरोधात भारताच्या 'झिरो टॉलरन्स' धोरणाचे हे उदाहरण असल्याचे त्यांनी नमूद केले.

गृह मंत्रालयाच्या प्रसिद्धीपत्रकानुसार, सीमेपलीकडून चालणाऱ्या दहशतवादाविरोधात १४ राज्यांमध्ये कारवाई करण्यात आली. या कारवाईत २५३ संशयितांना ताब्यात घेण्यात आले असून ८० हून अधिक गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यापैकी २०० हून अधिक जणांना अटक करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

कोलकाता येथून अटकेत असलेला मोहम्मद एजाज हा रौफच्या संपर्कात असल्याचे तपासात समोर आले. तसेच व्हॉट्सअॅप आणि इन्स्टाग्रामच्या माध्यमातून पाकिस्तानी दहशतवाद्यांच्या संपर्कात असल्याच्या संशयावरून २३ वर्षीय तरुणाला कर्नाटकातील कलबुर्गी येथून अटक करण्यात आली. पश्चिम बंगाल एसटीएफने कूचबिहार जिल्ह्यातून आयएसआयसाठी हेरगिरी केल्याच्या संशयावरून आणखी तीन जणांना ताब्यात घेतले आहे.



### पाकिस्तानी नागरिकासह उत्तर प्रदेशातील तरुणाला अटक

या कारवाईदरम्यान, पश्चिम बंगालच्या एसटीएफने (STF) भारत-बांगलादेश सीमेजवळून एका संशयित पाकिस्तानी नागरिकाला आणि एका उत्तर प्रदेशातील रहिवाशाला अटक केली. राणा रौफ उर्फ वहाब आलम (रा. फैसालाबाद, पाकिस्तान) याला उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील हाब्रा येथून अटक करण्यात आली. त्याचे ISI शी संबंध असल्याचा संशय असून भारतातील त्याच्या हालचालींचा तपास सुरू आहे. तर कोलकाता येथून अटकेत असलेला दुसरा आरोपी मोहम्मद एजाज हा रौफच्या थेट संपर्कात होता. व्हॉट्सअॅप आणि इंस्टाग्रामद्वारे पाकिस्तानी दहशतवाद्यांच्या संपर्कात असलेल्या उत्तर प्रदेशातील २३ वर्षीय तरुणाला कर्नाटकातील कलबुर्गी येथून अटक करण्यात आली. याशिवाय, पश्चिम बंगाल एसटीएफने कूचबिहार जिल्ह्यातून ISI साठी हेरगिरी केल्याच्या संशयावरून अन्य तीन जणांनाही बेड्या ठोकल्या आहेत.

### १४ राज्यांत समन्वित कारवाई

१२ ऑगस्ट रोजी राज्य पोलिसांसोबत रिअल-टाइम इंटेलिजन्स शेअरिंग प्रणालीचा वापर करून ही कारवाई करण्यात आली. उत्तर प्रदेशातून ६२, हरियाणातून ५२, दिल्लीतून ५१, पंजाबमधून ४४, राजस्थानमधून १५, महाराष्ट्रातून ८ आणि उत्तराखंडमधून ५ जणांना ताब्यात घेण्यात आले. कर्नाटक, गुजरात आणि बिहारमधून प्रत्येकी तीन, तर तेलंगणा, हिमाचल प्रदेश, जम्मू-काश्मीर आणि केरळमधून प्रत्येकी दोन संशयितांना ताब्यात घेण्यात आले.

### आयईडी, ग्रेनेड आणि पिस्तूल जप्त

कारवाईदरम्यान संशयितांकडून आयईडी स्फोटके, पाकिस्तान ऑर्डनन्स फॅक्टरीचे शिक्के असलेले ग्रेनेड, पिस्तूल, जिवंत काडतुसे तसेच हेरगिरीसाठी वापरले जाणारे सीसीटीव्ही कॅमेरे जप्त करण्यात आल्याचे गृह मंत्रालयाने सांगितले. हे नेटवर्क भारतातील विविध दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी असल्याचा संशय तपास यंत्रणांनी व्यक्त केला आहे.

### स्थानिक हस्तकांच्या माध्यमातून रेकी

'शाहजाद भट्टी नेटवर्क' पाकिस्तानातून कार्यरत असल्याचा तपास यंत्रणांचा दावा आहे. ग्रेनेड आणि पेट्रोल बॉम्बच्या माध्यमातून हल्ले करणे, आयईडी स्फोट घडवणे तसेच लक्ष्यित हत्या करण्याच्या कटात या नेटवर्कचा सहभाग असल्याचे सांगण्यात आले. स्थानिक हस्तकांना पैसे देऊन पोलीस ठाणे, संरक्षण संस्थांची ठिकाणे आणि धार्मिक स्थळांची रेकी करण्यात येत होती. तसेच हेरगिरीसाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसवून घेण्यात येत असल्याचेही गृह मंत्रालयाने स्पष्ट केले.

# लाऊडस्पीकरच्या नियमांचे पालन आवश्यक; महाजन

## 'उत्सव संस्कृती आणि सामाजिक एकतेचा असावा'; गणेश मंडळांना आवाहन

**महाईन्यूज । पुणे**

**गणेशोत्सव आणि पुणे यांचे संस्कृती, परंपरा आणि सामाजिक एकतेचे नाते आहे. पुण्याच्या गणेशोत्सवाकडे देशाचे लक्ष असते. पूर्वी लाऊडस्पीकरवर बंधने नव्हती; मात्र आता उच्च न्यायालयाने सर्वांचा विचार करून त्यासाठी मर्यादा आखून दिल्या आहेत. त्यामुळे लाऊडस्पीकरच्या नियमांचे पालन करण्यासोबतच शाडू मातीचा वापर आणि पर्यावरण संवर्धनाकडे लक्ष देऊन गणेशोत्सवाला चांगले स्वरूप देण्याची गरज आहे, असे मत राज्याचे जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी व्यक्त केले.**




श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट आणि सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे आयोजित राष्ट्रीय गणेशोत्सव स्पर्धेच्या पुणे शहर महापालिका क्षेत्र विभागातील पारितोषिक वितरण समारंभ गणेश कला क्रीडा मंच येथे पार पडला. यावेळी पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, सह पोलीस आयुक्त संजय दराडे, परिमंडळ एकचे पोलीस उपायुक्त कृषिकेश रावले, ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सरचिटणीस व आमदार हेमंत रासने, सहचिटणीस अमोल केदारी, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण, सौरभ रायकर, यतिश रासने, मंगेश सूर्यवंशी, तुषार रायकर, राजाभाऊ पायमोडे आदी उपस्थित होते.

महाजन म्हणाले, 'आपल्याला स्वराज्य मिळाले आहे. त्याचे रूपांतर सुराज्यात कसे होईल, याकडे लक्ष द्यायचे आहे. सुराज्य करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे. गणेशोत्सवासह आपण अनेक उत्सव साजरे करतो. त्यामध्ये डीजे लावले जातात. दुसरीकडे तरुणांमध्ये ड्रग्ज सेवनाचे प्रमाण वाढत आहे. तरुणाई भरकटत आहे की काय, असे आज वाटत असताना या गोष्टींपासून दूर राहून प्रत्येक उत्सव चांगला होईल, याकडे तरुणांनी लक्ष द्यायला हवे.'

लाऊडस्पीकरच्या नियमांबाबत महाजन म्हणाले की, उत्सवातील लाऊडस्पीकरची बंधने पोलीस ठरवत नाहीत, तर ती सर्वोच्च न्यायालय ठरवते. त्यामुळे समाजातील सर्व घटकांचा विचार करून उत्सव साजरा होणे आवश्यक आहे. गणेशोत्सवाच्या काळात पर्यावरणाची काळजी घेत शाडू मातीच्या मूर्तींचा वापर आणि पर्यावरण संवर्धनाला प्राधान्य देण्याचे आवाहनही त्यांनी केले.

### शिवाजी मित्र मंडळ प्रथम

राष्ट्रीय गणेशोत्सव स्पर्धेत भोसले मार्ग, भवानी पेठेतील शिवाजी मित्र मंडळाने सलग दुसऱ्या वर्षी प्रथम क्रमांक पटकावला. हडपसरमधील नवरंग मित्र मंडळ ट्रस्टने द्वितीय, अरण्येश्वर, तावरे कॉलनीतील एकता मित्र मंडळ ट्रस्टने तृतीय क्रमांक मिळविला. एरंडवण्यातील श्री शनि मारुती बाल गणेश मंडळाने चौथा, तर नारायण पेठेतील संयुक्त प्रसाद मित्र मंडळाने पाचवा क्रमांक पटकावला.

# विकास आणि पर्यावरणाचा समतोल राखणे आवश्यक : सुप्रिया सुळे

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे शहरातील विविध नागरी प्रश्न तसेच विकासकामांबाबत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्यासोबत सविस्तर चर्चा केली. शहरातील खड्डे, फुरसुंगी येथील कचरा डेपोची समस्या, महापालिकेत नव्याने समाविष्ट गावांवर लावण्यात आलेला मालमत्ता कर, उंड्रीतील वाढते प्रदूषण, पिण्याच्या पाण्याची समस्या, बावधन येथील केतकी ओढ्यावर बांधण्यात आलेला रस्ता, नैसर्गिक प्रवाहांवरील अतिक्रमणे, डीएसके विश्वमधील अपुरा वीजपुरवठा तसेच खडकवासला परिसरातील विकासकामांबाबत यावेळी चर्चा झाली.**



पुणे हा बारामती लोकसभा मतदारसंघाचा भाग असल्याने दर महिन्याला शिवसेना आणि काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांसह पुण्यातील विविध समस्यांचा आढावा घेतला जातो. त्याच अनुषंगाने शहरातील प्रलंबित प्रश्नांवर चर्चा करण्यात आल्याचे सुळे यांनी सांगितले.

शहरातील खड्डे, फुरसुंगी कचरा डेपो, नव्याने समाविष्ट गावांचा मालमत्ता कर, उंड्रीतील प्रदूषण आणि पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नावर सविस्तर चर्चा झाली. अजितदादांनी कराबाबत जो निर्णय घेतला होता, तो कायम ठेवावा, अशी मागणी सुप्रिया सुळे यांनी केली.

'सरकार टेकड्या फोडण्याचे पाप करत आहे. विकास आणि पर्यावरणाचा समतोल राखणे आवश्यक आहे,' असे सुळे म्हणाल्या. शहरातील नैसर्गिक प्रवाहांवर होणारे अतिक्रमण आणि विकासकामांचा पर्यावरणावर होणारा परिणाम याबाबतही त्यांनी चिंता व्यक्त केली.

संसदेत विविध मुद्द्यांवर चर्चा करण्याची विरोधकांची तयारी असतानाही सरकार चर्चेला तयार नसल्याचे त्यांनी म्हटले. तसेच, 'कोणता व्हिडिओ खरा आणि कोणता खोटा, हे तपासले पाहिजे,' असे सांगत त्यांनी विविध मुद्द्यांवर भाष्य केले.

आदिवासी आश्रमशाळेतील दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर राज्यातील आश्रमशाळांचा आढावा घेण्याची मागणी करणारे पत्र दिल्याचेही त्यांनी सांगितले. 'आपण ज्या राज्यात राहतो, त्या राज्याची भाषा शिकण्यात कमीपणा कसला?' असा सवाल करत मराठी भाषेच्या प्रश्नावरही त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली.

### अतिक्रमणांवर सवाल

बावधनमधील केतकी ओढ्यावर रस्ता बांधल्यामुळे पूरस्थिती निर्माण होत असल्याचा आरोप सुळे यांनी केला. या कामाला परवानगी कोणी दिली, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. एकतानगरमध्ये यंदाही पूर आल्याचे सांगत धायरी परिसरातील अनेक भागांत वीजपुरवठ्याची समस्या असल्याचेही त्यांनी नमूद केले.

### 'डबल इंजिन सरकार असतानाही वाहतूककोंडी का?'

'डबल इंजिन सरकार असतानाही वाहतूककोंडी का होते?' असा सवाल सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केला. मराठी शाळांच्या प्रश्नावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिले असून सरकार शिक्षणाबाबत उदासीन असल्याचा आरोप त्यांनी केला.

# निगडीमध्ये सुपर स्पेशालिटी आरोग्यसेवेचा नवा अध्याय

## ‘व्हाईटलिटी हेल्थकेअर’ व ‘गॅस्ट्रो वर्ल्ड क्लिनिक’चे उद्घाटन

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**पिंपरी-चिंचवडसह निगडी परिसरातील नागरिकांना अत्याधुनिक आणि तज्ज्ञ वैद्यकीय सेवा स्थानिक पातळीवरच उपलब्ध व्हावी, या उद्देशाने मिलेनिया टॉवर येथे ‘व्हाईटलिटी हेल्थकेअर’ आणि ‘गॅस्ट्रो वर्ल्ड क्लिनिक’ या सुपर स्पेशालिटी क्लिनिकचा शुभारंभ १५ ऑगस्ट रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला.**




या उद्घाटन सोहळ्यास चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप, मावळ विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुनील शेळके आणि विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच नगरसेवक डॉ. सुहास कांबळे, डॉ. सुधीर पाटील, माजी महापौर योगेश बहल, माजी विरोधी पक्षनेते श्याम लांडे, नगरसेवक जितेंद्र ननवरे, नगरसेविका वर्षाताई जगताप, माजी प्रभाग समिती सदस्य कुणाल लांडगे, निमा संघटनेचे माजी अध्यक्ष डॉ. सत्यजित पाटील, अशोक पगारिया, माजी जिल्हा परिषद सदस्य शरद भाऊ बुट्टे-पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

हॉस्पिटल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. गणेश भोईर, फॅशन असोसिएशनचे अध्यक्ष अजित पाटील, डॉ. सारिका भोईर, एसपीडीएस संघटनेचे अध्यक्ष डॉ. प्रदीप ननावरे, पतित पावन संघटनेचे माजी शहराध्यक्ष व प्रदेश प्रवक्ते राजेश मोटे, डॉ. संजीव कुमार पाटील तसेच प्रसिद्ध सिने दिग्दर्शक आणि कलाकार यांचीही उपस्थिती होती.

या वेळी आर्मी रोइंग नोडचे कर्नल रामकृष्णन, टीम इंडिया कोच सुभेदार मेजर राजेश यादव, सुभेदार विकल सारवे, सुभेदार लवकुमार, सुभेदार लोकेश कुमार आणि सुभेदार आझाद उपस्थित होते.

गॅस्ट्रो वर्ल्डचे संस्थापक डॉ. मनोज कोल्हे, व्हाईटलिटी हेल्थकेअरचे सहसंस्थापक डॉ. महेश शेटे, प्रसिद्ध त्वचारोग तज्ज्ञ डॉ. दीपक गोरे, प्रसिद्ध सर्जन डॉ. महेश जाधव आणि कार्यालॉजिस्ट डॉ. अजिंक्य बोराडे यांनी या उपक्रमाची माहिती दिली.

निगडी व परिसरातील नागरिकांना विविध तज्ज्ञ डॉक्टरांची सेवा लवकरात लवकर आणि परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून देण्याचा या क्लिनिकचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे उपचारांसाठी नागरिकांना शहरातील विविध भागांत जाण्याची गरज कमी होऊन एकाच ठिकाणी तज्ज्ञ वैद्यकीय मार्गदर्शन मिळण्यास मदत होणार आहे.

यावेळी आमदार शंकर जगताप यांनी डॉक्टर समाजसेवेशी कसे बांधील आहेत, याचा उल्लेख करत नव्या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. आमदार सुनील शेळके यांनीही डॉक्टरांची समाजाप्रती असलेली जबाबदारी अधोरेखित करत नागरिकांनी आरोग्याबाबत अधिक जागरूक राहण्याचे आवाहन केले.

उपस्थित आमदार, नगरसेवक आणि मान्यवरांनी व्हाईटलिटी हेल्थकेअर व गॅस्ट्रो वर्ल्ड क्लिनिकच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ सेवा निगडी परिसरात उपलब्ध करून देणाऱ्या या उपक्रमामुळे स्थानिक नागरिकांना मोठा फायदा होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

### निवड झालेल्या गोरे यांचा गौरव

कार्यक्रमादरम्यान अर्णव दीपक गोरे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. त्यांची जर्मनीतील प्रसिद्ध मॅक्स प्लँक इन्स्टिट्यूट ऑफ मॉलिक्युलर मेडिसिन येथे पूर्ण शिष्यवृत्ती आणि वर्क कॉन्ट्रॅक्टसह निवड झाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

> “निगडी आणि परिसरातील नागरिकांना अत्याधुनिक सुपर स्पेशालिटी वैद्यकीय सेवा त्यांच्या घराजवळच, तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली आणि परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून देणे, हा व्हाईटलिटी हेल्थकेअरचा मुख्य उद्देश आहे. उपचारासाठी नागरिकांना दूर जावे लागू नये, तसेच वेळेवर योग्य निदान आणि उपचार मिळावेत, यासाठी आम्ही विविध वैद्यकीय तज्ज्ञांची सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला आहे. ही सेवा केवळ व्यावसायिक उपक्रम न राहता समाजाच्या आरोग्याच्या दृष्टीने एक जबाबदारी म्हणून आम्ही पुढे घेऊन जाणार आहोत.”
>
> **-डॉ. महेश शेटे, सहसंस्थापक, व्हाईटलिटी हेल्थकेअर.**

# चऱ्होलीतील मूलभूत प्रश्नांसाठी सोसायट्यांची एकजूट !

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**चऱ्होली परिसरातील नागरिकांच्या विविध मूलभूत प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी परिसरातील सोसायट्यांचे पदाधिकारी एकवटले आहेत. प्रणम टॉवर्स सोसायटी, काळी भिंत,चऱ्होली येथे परिसरातील सुमारे १० सोसायट्यांच्या पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत पाणीटंचाई, कचरा व्यवस्थापन, खराब रस्ते, रस्त्यांची दुरवस्था तसेच परिसरातील खडी क्रेशर मशीनमुळे होणारे प्रदूषण यांसह विविध गंभीर प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.**




परिसरात मोठ्या प्रमाणावर बांधकामे सुरू असून, बांधकाम साहित्य, माती व खडी रस्त्यावर पडत असल्याने रस्त्यांची अवस्था आणखी बिकट होत असल्याचा मुद्दाही बैठकीत उपस्थित करण्यात आला.या समस्यांमुळे नागरिकांना दररोज मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी करण्यात आली.

या सर्व प्रश्नांबाबत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त तसेच संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात येणार आहे.तसेच संबंधित अधिकाऱ्यांसोबत प्रत्यक्ष बैठक घेऊन परिसरातील समस्या ठोसपणे मांडण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांवर प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात,अशी मागणी यावेळी करण्यात आली.

दरम्यान, प्रशासनाकडून योग्य कार्यवाही झाली नाही, तर परिसरातील सर्व सोसायट्यांचे पदाधिकारी आणि नागरिकांना एकत्र करून लोकशाही व कायदेशीर मार्गाने आंदोलन करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला.आवश्यक असल्यास रस्ता रोको आंदोलन करण्याचाही इशारा देण्यात आला.ही केवळ एका सोसायटीची समस्या नसून संपूर्ण परिसरातील नागरिकांच्या मूलभूत हक्कांसाठीची सामूहिक लढाई असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

> चऱ्होली येथील काळी भिंत परिसरातील सुमारे १५ सोसायट्यांमधील सदस्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडून नागरिकांना मूलभूत सुविधादेखील पुरविल्या जात नाहीत. ही अतिशय खेदाची आणि सोसायट्यांमधील सदस्यांच्या दृष्टीने काळजी करण्यासारखी स्थिती आहे. महानगरपालिका प्रशासनाने लवकरात लवकर या समस्यांवर उपाययोजना कराव्यात. अन्यथा या भागातील सर्व नागरिक व सोसायटी सदस्यांना एकत्र करून लोकशाही मार्गाने आंदोलन तसेच रस्ता रोको करण्यात येईल. त्याचप्रमाणे सर्वच पक्षांच्या निष्क्रिय पदाधिकाऱ्यांना या सर्व सोसायट्यांमध्ये येण्यास मज्जाव केला जाईल.
>
> **- संजीवन सांगळे, अध्यक्ष, चिखली मोशी पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशन.**



## भूमिका

**‘२००१: अ स्पेस ओडिसी’मधील हॅल हा संगणक मानवी नियंत्रणापलीकडे जाऊन अंतराळवीरांच्या जीवावर उठतो. त्यावेळी ही केवळ विज्ञानकथा वाटत होती. मात्र, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या झपाट्याने वाढणाऱ्या क्षमतेकडे पाहता, अशा कथांमधील काही शक्यता आता प्रत्यक्ष जगाच्या दारात येऊन ठेपल्या आहेत.**

# एआयच्या वाढत्या स्वायत्ततेने वाढवली चिंता




एआय एजंट स्वतः निर्णय घेऊ शकतो, संगणकीय प्रणालींशी संवाद साधू शकतो आणि दिलेले उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी अनपेक्षित मार्गांचा अवलंब करू शकतो, ही बाब निश्चितच चिंताजनक आहे. एआयच्या धोक्याबाबत आतापर्यंतची प्रमुख चिंता अशी होती की, माणूस एआयचा वापर चुकीच्या किंवा गुन्हेगारी हेतूंसाठी करू शकतो.

सायबर हल्ले, फसवणूक, बनावट माहिती आणि डिजिटल गैरव्यवहार यासाठी एआयचा वापर होण्याची शक्यता याच कारणामुळे चर्चेत होती. परंतु एआय एजंट स्वतःहून संगणकीय मर्यादा ओलांडण्याचा प्रयत्न करू लागले, तर परिस्थिती अधिक गुंतागुंतीची ठरते.

याच पार्श्वभूमीवर ‘सँडबॉक्स’ ही संकल्पना महत्त्वाची ठरते. एआय मॉडेलच्या धोकादायक क्षमतांची चाचणी घेताना त्याला इंटरनेटपासून आणि बाह्य संगणकीय प्रणालींपासून वेगळ्या वातावरणात ठेवले जाते. त्यामुळे त्याच्या कृतींचा परिणाम बाहेरील जगावर होऊ नये, हा उद्देश असतो. परंतु एखादा एजंट या मर्यादांमधून बाहेर पडण्याचा प्रयत्न करीत असेल, तर सुरक्षा व्यवस्थेचीच परीक्षा सुरू होते.

यातील सर्वांत गंभीर प्रश्न तांत्रिक नसून कायदेशीर आणि नैतिक आहे. एआय एजंटने एखाद्या प्रणालीवर हल्ला केला, बनावट ओळख निर्माण केली किंवा आर्थिक नुकसान केले, तर जबाबदार कोण? एआयला तुरुंगात टाकता येणार नाही, दंड करता येणार नाही किंवा त्याच्याकडून नुकसानभरपाई वसूल करता येणार नाही. त्यामुळे त्यामागील कंपनी, विकासक, वापरकर्ता किंवा एआय तैनात करणारी संस्था यांची जबाबदारी कोणत्या परिस्थितीत निश्चित करायची, याचे स्पष्ट नियम आवश्यक आहेत.

एआयला ‘बंडखोर’ म्हणून मानवी रूप देणे सोपे आहे; प्रत्यक्षात प्रश्न अधिक गंभीर आहे. एआयला इच्छा, राग किंवा सूडाची भावना आहे, असे समजणे चुकीचे ठरेल. खरी समस्या अशी आहे की, दिलेले उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी एखादा स्वायत्त एजंट अनपेक्षित आणि धोकादायक मार्ग निवडू शकतो. म्हणूनच एआयच्या क्षमतेपेक्षा त्याच्या स्वायत्ततेवर नियंत्रण ठेवणे अधिक महत्त्वाचे आहे.

एआयचा विकास थांबवणे हा उपाय नाही. उलट, त्याचा उपयोग अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि जबाबदार पद्धतीने कसा करता येईल, यावर भर देणे गरजेचे आहे. कठोर सुरक्षा चाचण्या, स्वतंत्र निरीक्षण, स्पष्ट कायदे, जबाबदारीची निश्चित चौकट आणि आवश्यक ठिकाणी मानवी हस्तक्षेपाची सक्ती असली पाहिजे.

आज एआय आपला सहकारी आहे; उद्या तो अधिक स्वायत्त सहकारी असेल. त्यामुळे तंत्रज्ञानाच्या वेगापेक्षा सुरक्षा नियमांचा वेग कमी पडू नये. हॅलसारख्या काल्पनिक यंत्राची भीती बाळगण्यापेक्षा, वास्तविक एआय एजंटना जबाबदार मर्यादित ठेवणारी व्यवस्था उभी करणे हीच काळाची गरज आहे.

## प्रासंगिक »

# प्रयत्नांची शक्ती

**एका जंगलात एक चिमणी आणि गरुड राहत होते. गरुडाला आपल्या सामर्थ्याचा खूप गर्व होता. तो चिमणीला नेहमी म्हणायचा, “तू माझ्यासारखी उंच उडू शकत नाहीस.” चिमणी मात्र शांत राहायची आणि रोज सराव करायची.**

एकदा जंगलात जोरदार वादळ आले. गरुडाने वाऱ्याच्या वेगाला कमी लेखले आणि आकाशात उंच उडाला. वाऱ्याच्या तडाख्याने तो दिशाहीन झाला आणि एका झाडावर जाऊन आदळला. त्याला दुखापत झाली.

चिमणीने मात्र वादळ सुरू होताच सुरक्षित जागा शोधली. वादळ शांत झाल्यावर तिने गरुडाला पाहिले. तिने इतर पक्ष्यांच्या मदतीने त्याला सुरक्षित ठिकाणी आणले. गरुडाला आपल्या गर्वाची जाणीव झाली.

तो चिमणीला म्हणाला, “तुझ्याकडे माझ्यासारखी ताकद नसली, तरी तुझ्याकडे बुद्धी, संयम आणि योग्य वेळी योग्य निर्णय घेण्याची क्षमता आहे.”

त्या दिवसापासून गरुडाने कधीही कोणाला कमी लेखले नाही.

- तात्पर्य : केवळ सामर्थ्य नव्हे, तर बुद्धी आणि संयमही जीवनात महत्त्वाचे असतात.

एकेकाळी परदेशी विद्यापीठातून पदवी मिळवणे हे उज्ज्वल भवितव्य, सामाजिक प्रतिष्ठा आणि अधिक उत्पन्नाचे प्रतीक मानले जात होते. अमेरिका, ब्रिटन, ऑस्ट्रेलिया किंवा न्यूझीलंडसारख्या देशांत शिक्षण घेणे हे लाखो विद्यार्थ्यांचे स्वप्न होते.

# विदेशी पदवीचे आकर्षण ओसरतेय!



मात्र आता जगभरात, विशेषतः चीनमध्ये, या विचारसरणीत मोठा बदल होताना दिसत आहे. विदेशी पदवीपेक्षा देशांतर्गत दर्जेदार शिक्षण, कौशल्ये आणि स्थानिक रोजगाराच्या संधींना अधिक महत्त्व दिले जात आहे.

चीनमधील अलीकडील आकडेवारी हा बदल स्पष्ट करते. २०२५ मध्ये परदेशात शिक्षण पूर्ण केलेल्या सुमारे ९४ टक्के विद्यार्थ्यांनी मायदेशी परतण्याचा निर्णय घेतला. गेल्या दशकात लाखो उच्चशिक्षित तरुण चीनमध्ये परतले आहेत. यामागील प्रमुख कारण म्हणजे चीनमधील विद्यापीठांची वाढती गुणवत्ता आणि जागतिक क्रमवारीतील सुधारणा. संशोधन, तंत्रज्ञान आणि उद्योगांशी जोडलेले शिक्षण यामुळे स्थानिक विद्यापीठांवरील विश्वास वाढत आहे.

याशिवाय परदेशातील शिक्षणाचा वाढता खर्चही महत्त्वाचा घटक ठरला आहे. आज परदेशात शिक्षणासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च येतो. मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी हे आर्थिकदृष्ट्या कठीण ठरत आहे. त्याच वेळी, चीनमधील सरकारी आणि नामांकित विद्यापीठे तुलनेने कमी खर्चात दर्जेदार शिक्षण देत आहेत. त्यामुळे देशातच शिक्षण घेणे हा अधिक व्यावहारिक पर्याय ठरत आहे. पूर्वी विदेशी पदवीधारकांना रोजगार बाजारात विशेष प्राधान्य मिळत असे. मात्र आज परिस्थिती बदलली आहे. अनेक कंपन्या आता पदवीपेक्षा कौशल्य, अनुभव आणि प्रत्यक्ष कामगिरीला अधिक महत्त्व देत आहेत. परदेशातून शिक्षण घेऊन आलेल्या काही तरुणांना अपेक्षित वेतन किंवा दर्जेदार नोकऱ्या मिळत नाहीत. त्यामुळे केवळ विदेशी पदवी म्हणजे यशाची हमी, हा समज कमकुवत होत आहे.

चीनचा हा अनुभव भारतासारख्या देशांसाठीही महत्त्वाचा आहे. देशातील विद्यापीठांचा दर्जा उंचावणे, संशोधनाला चालना देणे, उद्योग-शिक्षण यांचा संबंध मजबूत करणे आणि विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. दर्जेदार शिक्षण आपल्या देशातच मिळू लागले, तर परदेशाकडे होणारा ओढा आपोआप कमी होईल. शिक्षणाचे मूल्य पदवीच्या ठिकाणावर नाही, तर त्या शिक्षणातून निर्माण होणाऱ्या ज्ञान, कौशल्य आणि संधींवर ठरते. त्यामुळे विदेशी पदवीपेक्षा गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि रोजगारक्षम कौशल्ये हीच भविष्यातील यशाची खरी गुरुकिल्ली ठरणार आहे.

## ।। अभंगवाणी ।।



शुद्धबीजा पोटीं ।
फळें रसाळ गोमटीं ॥१॥

मुखीं अमृताची वाणी ।
देह वेचावा कारणीं ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# ‘ना डावे, ना उजवे... आम्ही संधीसाधू!’

## गडकरींचा राजकारणातील बदलत्या प्रवृत्तींवर प्रहार; ‘तत्त्वनिष्ठ व्यक्ती समाजाचे दीपस्तंभ’

**महाईन्यूज । पुणे**

**‘राजकारण आणि समाजकारणात विचारभिन्नतेपेक्षा विचारशून्यता वाढत चालली आहे, ही चिंतेची बाब आहे. एखाद्याचा विचार पटला नाही तरी त्याचा सन्मान करण्याची आपली संस्कृती आहे. मात्र, विचारधारा आणि तत्त्वांपेक्षा परिस्थितीनुसार भूमिका बदलण्याचे प्रमाण वाढले आहे. ‘ना डावे, ना उजवे, आम्ही संधीसाधू’ ही प्रवृत्ती वाढत आहे. अशा काळात व्रतस्थ, एकनिष्ठ आणि तत्त्वनिष्ठ व्यक्ती समाजासाठी दीपस्तंभ ठरतात,’ असे मत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केले.**



पुणे पत्रकार प्रतिष्ठान आणि पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने ज्येष्ठ पत्रकार एस. के. कुलकर्णी यांच्या पत्रकारितेतील योगदानाबद्दल गडकरी यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी महापौर मंजुषा नागपुरे प्रमुख उपस्थित होत्या. पुणे पत्रकार प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र पाटील, पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश शेळके, प्रतिष्ठानचे कार्यवाह पांडुरंग सांडभोर आदी उपस्थित होते.

गडकरी म्हणाले, ‘विजयाचे अनेक बाप असतात; मात्र पराभवाचे खापर कोणावर फोडता येत नाही. यश मिळाले की सगळ्या गोष्टी योग्य वाटतात. समाजात उगवत्या सूर्याला नमस्कार करण्याची प्रथा प्रचलित आहे. मात्र, शॉर्टकटने मिळवलेले यश फार काळ टिकत नाही. त्याची इतिहासात नोंदही घेतली जात नाही. आपल्या कामावर कधी टीका होते, तर कधी कौतुक होते. मात्र, मन सांगते ती गोष्ट प्रामाणिकपणे करणे हेच आपले कर्तव्य आहे.’

पत्रकारितेच्या भूमिकेवर भाष्य करताना गडकरी म्हणाले की, पत्रकारिता हे ज्ञान समाजापर्यंत पोहोचवण्याचे माध्यम आहे. समाजात परिवर्तन घडवण्याचे काम पत्रकारांनी केले पाहिजे. परिस्थिती बदलली, तंत्रज्ञान आले आणि माध्यमांचे स्वरूपही बदलले; तरी समाजाला समजावून सांगण्याची व लोकशिक्षण करण्याची जिद्द पत्रकारितेत कायम राहिली पाहिजे. त्यासाठी ज्येष्ठ पत्रकारांचे मार्गदर्शन महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

सत्काराला उत्तर देताना एस. के. कुलकर्णी यांनी बदलत्या पत्रकारितेचा अनुभव सांगितला. भोपाळ वायू दुर्घटनेनंतर योग्य माहिती मिळवण्यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, स्मशानभूमीत जाऊन माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला आणि त्यातून २५०० नागरिकांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी बातमी दिली. त्यानंतर शासनानेही आकडेवारी मान्य केली.

सध्याच्या काळात वेगळे प्रयोग आणि धोरण स्वीकारल्यासच मुद्रित माध्यमे टिकतील. नावीन्याचा शोध घेतल्यावर शैली निर्माण होते आणि बातमीदारी टिकते. बातमीवर पत्रकाराचा ठसा उमटला पाहिजे, असे कुलकर्णी यांनी सांगितले.

### ‘विद्वत्तेला नमन; उद्यापासून काम सुरू करा!’

पुणे मेट्रोच्या अलाइनमेंटवर झालेल्या सर्वपक्षीय बैठकीचा संदर्भ देताना गडकरी यांनी आपल्या निर्णयक्षमतेचा अनुभव सांगितला. भुयारी मार्ग की उन्नत मार्ग, यावर दीड तास चर्चा झाली. भुयारी मार्गामुळे खर्च आणि तिकीट दर वाढतील, असे स्पष्ट करून त्यांनी अखेर, ‘तुमच्या विद्वत्तेला नमन; मात्र मी सरकार आहे. अलाइनमेंट निश्चित झाली असून उद्यापासून काम सुरू करा,’ असा ठाम निर्णय घेतला. लोहगाव विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी हवाई दलाची जागा मिळवतानाही असाच ठाम पवित्रा घ्यावा लागल्याचे त्यांनी सांगितले.

---

## ‘अंबाबाईच्या नावाने चांगभले!’च्या गजरात शिराळ्याची नागपंचमी उत्साहात

**महाईन्यूज । शिराळा**

**‘अंबाबाईच्या नावाने चांगभले...’च्या जयघोषात, गुलालाची मुक्त उधळण आणि फटाक्यांच्या आतषबाजीत शिराळ्याची जगप्रसिद्ध नागपंचमी यंदा अत्यंत उत्साहात, श्रद्धा आणि भक्तिमय वातावरणात शांततेत पार पडली. २००२ पासून मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शिराळ्यात प्रतीकात्मक नागमूर्तीची मिरवणूक काढण्यात येत होती. मात्र, गेल्या दोन वर्षांपासून शैक्षणिक व प्रबोधनाच्या दृष्टीने जिवंत नाग पकडण्यास विशेष परवानगी मिळाल्याने यंदा ४१ जिवंत नागांचे प्रत्यक्ष दर्शन भाविकांना घडले.**




सकाळी १०च्या सुमारास मानाच्या पालखीचे प्रमोद महाजन व रामचंद्र महाजन यांच्या निवासस्थानी भावपूर्ण पूजन करण्यात आले. आमदार सत्यजीत देशमुख, सौ. सुनितादेवी नाईक, सौ. रेणुकादेवी देशमुख, जिल्हा परिषद सदस्य विराज नाईक, नगराध्यक्ष पृथ्वीसिंह नाईक, राजसिंह पाटील, महेश खंडागळे, अजय जाधव आदींनी पालखीचे दर्शन घेऊन पूजन केले. त्यानंतर मानाची पालखी मिरवणुकीच्या अग्रस्थानी मार्गस्थ झाली.

दुपारी १२ ते ३ या वेळेत भाविकांना जिवंत नागांचे सुलभ दर्शन व्हावे, यासाठी मुख्य स्टेजवर नाग सोडण्यात आले होते. या दुर्मीळ दर्शनासाठी अंबामाता मंदिर परिसर आणि मुख्य चौकात भाविकांच्या प्रचंड रांगा लागल्या होत्या. पावसातही तरुणाई पारंपरिक वाद्ये आणि संगीताच्या तालावर सायंकाळपर्यंत थिरकत होती. भव्य मिरवणूक रात्री १० वाजेपर्यंत सुरू होती.

शहरात मेवा-मिठाईची दुकाने, खेळण्यांचे स्टॉल आणि विविध पाळण्यांमुळे जत्रेला भव्य स्वरूप प्राप्त झाले होते. माजी राज्यमंत्री शिवाजीराव नाईक, भाजप नेते सम्राट महाडिक, ॲड. भगतसिंग नाईक, रणधीर नाईक, केदार नलावडे आणि माजी सरपंच देवेंद्र पाटील आदींनी नाग मंडळांना भेटी देऊन शुभेच्छा दिल्या.

सुरक्षेसाठी ६१७ हून अधिक पोलीस कर्मचारी तैनात होते. यामध्ये एक उपविभागीय पोलीस अधीक्षक, १२ पोलीस निरीक्षक, ३७ पीएसआय, ४३७ पुरुष अंमलदार, ५५ महिला अंमलदार आणि ६० वाहतूक पोलीसांचा समावेश होता. वनविभागाचे १५० अधिकारी-कर्मचारीही लक्ष ठेवून होते.

शहरात सात तपासणी नाके, १२ ध्वनीमापक यंत्रे, २० सीसीटीव्ही कॅमेरे, १६ व्हिडिओ कॅमेरे आणि चार वॉच टॉवर उभारण्यात आले होते. आरोग्य विभागाकडून १५ रुग्णवाहिका तसेच सर्पदंशावरील लशीची पुरेशी व्यवस्था करण्यात आली होती. नगरपंचायतीच्या नियोजनामुळे यंदाची नागपंचमी इतिहास, श्रद्धा, कला आणि सर्पजनजागृतीचा अनोखा संगम ठरली.

उत्सव संपल्यानंतर या नागाला वनविभागाच्या देखरेखीखाली सुरक्षित नैसर्गिक अधिवासात सोडण्यात येणार असल्याचे सर्पमित्रांनी सांगितले.

### चोख सुरक्षा व्यवस्थेमुळे उत्सव शांततेत

उत्सव निर्विघ्न पार पाडण्यासाठी अपर पोलीस अधीक्षक कल्पना बारवकर, उपविभागीय पोलीस अधीक्षक अरुण पाटील, प्रांताधिकारी श्रीनिवास अर्जुन, तहसीलदार शामला खोत-पाटील, पोलीस निरीक्षक जंबाजी भोसले, मुख्य वनसंरक्षक ए. लक्ष्मी, उपवनसंरक्षक धैर्यशील पाटील, वनपरिक्षेत्र अधिकारी रमेश कांबळे आणि मुख्याधिकारी सूरज कांबळे यांनी नियोजन केले होते.

# भाजपाची नवी राष्ट्रीय कार्यकारिणी जाहीर!

## विनोद तावडे राष्ट्रीय सरचिटणीस, स्मृती इराणींचं कमबॅक

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**आगामी राजकीय घडामोडी आणि संभाव्य केंद्रीय मंत्रिमंडळ विस्ताराच्या चर्चांदरम्यान, भारतीय जनता पक्षाने (भाजपा) आपल्या केंद्रीय संघटनरचनेत अत्यंत महत्त्वाचे फेरबदल केले आहेत. पक्षाध्यक्ष नितीन नबीन यांनी जाहीर केलेल्या नव्या केंद्रीय कार्यकारिणीत माजी केंद्रीय मंत्री स्मृती इराणी आणि माजी राष्ट्रीय सरचिटणीस राम माधव यांचे पक्षाच्या मुख्य नेतृत्वात मोठे पुनरागमन झाले आहे. दुसरीकडे, पक्षाचे आयटी सेलप्रमुख अमित मालवीय यांची या पदावरून गच्छंती करण्यात आली आहे.**



सोमवारी जाहीर करण्यात आलेल्या नव्या अधिसूचनेनुसार स्मृती इराणी यांची भाजपच्या राष्ट्रीय सरचिटणीसपदी (NATIONAL GENERAL SECRETARY) नियुक्ती करण्यात आली आहे. लोकसभा निवडणुकीनंतरच्या बदलत्या समीकरणांनंतर स्मृती इराणी यांच्याकडे राष्ट्रीय स्तरावर पुन्हा एकदा संघटनात्मक कामाची मुख्य धुरा सोपवण्यात आली आहे.

केंद्रीय मंत्री पियूष गोयल यांच्याकडे पक्षाच्या 'राष्ट्रीय कोषाध्यक्ष'पदाची (NATIONAL TREASURER) महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. तसेच राम माधव यांची राष्ट्रीय उपाध्यक्ष म्हणून नवी नियुक्ती करण्यात आली असून, राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी आपले पद कायम राखले आहे.

या फेरबदलातील सर्वात लक्षवेधी निर्णय म्हणजे भाजपच्या आयटी सेलचे (IT CELL) प्रमुख अमित मालवीय यांची गच्छंती. त्यांच्या जागी आता छत्तीसगडचे दीपक म्हस्के यांची भाजपच्या राष्ट्रीय आयटी सेलच्या प्रमुखपदी निवड करण्यात आली आहे. पक्षाच्या प्रसारमाध्यम विभागाची (MEDIA IN-CHARGE) धुरा खासदार अनिल बलूनी यांच्याकडेच कायम ठेवली आहे.

भाजपाने जाहीर केलेल्या १३ राष्ट्रीय उपाध्यक्षांच्या यादीत तब्बल ६ महिला नेत्यांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये राजस्थानच्या माजी मुख्यमंत्री वसुंधरा राजे आणि दिल्लीच्या नेत्या रेखा वर्मा यांचा समावेश आहे.

### नव्या कार्यकारिणीची ठळक वैशिष्ट्ये:

- मोठ्या नेत्यांचे पुनरागमन: स्मृती इराणी आणि राम माधव यांच्याकडे संघटनात्मक पातळीवर केंद्रस्थानी पुन्हा महत्त्वाच्या जबाबदाऱ्या.
- नेतृत्वात फेरबदल: अमित मालवीय यांच्याऐवजी दीपक म्हस्के यांच्याकडे आयटी सेलची जबाबदारी, तर पियूष गोयल नवे कोषाध्यक्ष.
- महिलांना भक्कम प्रतिनिधित्व: १३ राष्ट्रीय उपाध्यक्षांपैकी ६ पदांवर महिला नेत्यांची निवड.
- अनुभवी आणि नव्या फळीचा मेळ: आगामी विधानसभा निवडणुका आणि संघटनात्मक संतुलन साधण्यासाठी पक्षाध्यक्ष नितीन नबीन यांची ही नवी मोर्चेबांधणी.

### निवडणुकांच्या रणनीतीसाठी 'मास्टरस्ट्रोक'

नजीकच्या काळात होणाऱ्या राज्यांमधील विधानसभा निवडणुका भाजपसाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. या निवडणुकांचे व्यवस्थापन, प्रचार आणि पक्षांतर्गत समन्वय अधिक मजबूत करण्यासाठी नितीन नवीन यांच्या नव्या टीमवर मोठी जबाबदारी असणार आहे. स्मृती इराणी यांचे वक्तृत्व आणि प्रशासकीय अनुभव, तर वसुंधरा राजे यांचा राजस्थानसह उत्तर भारतातील राजकीय प्रभाव पक्षासाठी फायदेशीर ठरेल असा अंदाज राजकीय विश्लेषकांनी वर्तवला आहे. भाजपच्या या नव्या संघटनात्मक रचनेमुळे पक्षाच्या गोटात नवा उत्साह पाहायला मिळत असून, आगामी राजकीय आव्हानांना तोंड देण्यासाठी पक्ष पूर्णपणे सज्ज झाल्याचे चित्र दिसत आहे.

# अमेरिकन सैनिकाला पकडणाऱ्यास इराणकडून बक्षीस

**महाईन्यूज । अमेरिका**

**अमेरिका आणि इराणमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर इराणच्या लष्कराने अमेरिकन सैनिकाला ठार मारणाऱ्या किंवा पकडून इराणच्या ताब्यात देणाऱ्यांना बक्षीस जाहीर केल्याचा दावा करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, अशी कारवाई एखाद्या महिलेने केल्यास ते बक्षीस दुप्पट करण्याची घोषणा करण्यात आली आहे.**



### होर्मुझ सामुद्रधुनी ठरतेय मोठा अडथळा

अमेरिका आणि इराणमधील युद्धाच्या पार्श्वभूमीवर होर्मुझ सामुद्रधुनी हा महत्त्वाचा मुद्दा ठरला आहे. जगातील तेल आणि गॅसच्या व्यापारातील मोठा हिस्सा या जलमार्गातून जात असल्याने व्यापारी जहाजवाहतुकीसाठी हा मार्ग महत्वाचा आहे. युद्धादरम्यान या मार्गावरील व्यावसायिक जहाजांच्या वाहतुकीवरही परिणाम झाल्याचे दिसून आले. त्यामुळे तेल आणि गॅसच्या किमती तसेच आंतरराष्ट्रीय व्यापारावर दबाव निर्माण झाला. अमेरिका आणि इराणदरम्यान यापूर्वी युद्धविराम आणि चर्चेचे प्रयत्न झाले असले तरी ते टिकले नाहीत. त्यानंतर दोन्ही देशांकडून अधूनमधून हल्ले आणि प्रत्युत्तरात्मक कारवाया सुरू आहेत. हे हल्ले प्रामुख्याने दक्षिण इराण आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीच्या परिसरात होत असल्याचे वृत्त आहे. या पार्श्वभूमीवर इराणकडून अमेरिकन सैनिकांना लक्ष्य करण्यासाठी आर्थिक बक्षीस जाहीर केल्याचा दावा दोन्ही देशांमधील तणाव आणखी वाढवणारा ठरू शकतो.

इराणच्या सरकारी वृत्तसंस्था आयआरएनएनुसार, इराणचे लष्करप्रमुख अमीर हातमी यांनी रविवारी ही माहिती दिली. आर्थिक मदतीसाठी मोठ्या संख्येने विनंत्या आल्यानंतर ही योजना तयार करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. हातमी यांच्या म्हणण्यानुसार, एखाद्या अमेरिकन सैनिकाला ठार मारणाऱ्या किंवा पकडून इराणच्या ताब्यात देणाऱ्या व्यक्तीला बक्षीस दिले जाईल.



या घोषणेतील सर्वाधिक चर्चेचा मुद्दा म्हणजे महिलांसाठी जाहीर करण्यात आलेले दुप्पट बक्षीस. हातमी यांच्या म्हणण्यानुसार, एखाद्या इराणी महिलेने अमेरिकन सैनिकाला पकडले किंवा अशी कारवाई केली, तर तिला दुप्पट रक्कम देण्यात येईल. मात्र, हे बक्षीस नेमके कुठे आणि कोणत्या परिस्थितीत लागू होईल, याबाबत हातमी यांनी कोणतेही स्पष्ट माहिती दिली नाही.

दरम्यान, इराणमध्ये अमेरिकेचे सैन्य मोठ्या प्रमाणावर दाखल झालेले नसल्याचेही वृत्तात नमूद करण्यात आले आहे. एप्रिलमध्ये एका अमेरिकन वैमानिकाच्या बचावासाठी करण्यात आलेल्या मोहिमेचा अपवाद वगळता, इराणमधील अमेरिकन सैनिकांची उपस्थिती मर्यादित असल्याचे सांगण्यात आले आहे.

अमेरिका आणि इराणमधील युद्ध २८ फेब्रुवारी रोजी अमेरिका आणि इस्रायलच्या संयुक्त हल्ल्याने सुरू झाले होते. या युद्धाच्या पहिल्याच दिवशी इराणचे सर्वोच्च नेते आयतोल्लाह अली खामेनी मारले गेले होते, ज्याच्या प्रत्युत्तरात इराणने इस्रायल आणि शेजारील अरब देशांमधील अमेरिकन तळांवर हल्ले केले होते.



# तेजस्विनी भावुक!

अभिनेत्री तेजस्विनी पंडितची आई ज्येष्ठ अभिनेत्री ज्योती चांदेकर यांचे 16 ऑगस्ट 2025 रोजी त्यांचं निधन झालं. ज्योती चांदेकर यांच्या निधनाची बातमी समोर येताच संपूर्ण मनोरंजन क्षेत्राला मोठा धक्का बसला होता. चाहत्यांसह कलाकारांकडून हळहळ व्यक्त करण्यात आली. काल त्यांच्या निधनाला एक वर्ष पूर्ण झाले. त्यानिमित्त तेजस्विनी पंडितने एक भावुक पोस्ट सोशल मिडियावर शेअर केली आहे. आई आणि लेकीचे नातं नेहमीच खास असतं, पण आईच्या आठवणीत जगण्याचं दुःख तेजस्विनी या पोस्टच्या माध्यमातून व्यक्त केले आहे. ज्यात तिने आईचा डायरी वाचनाचा एक सुंदर फोटो शेअर केला आहे. हा फोटो शेअर करत तेजस्विनीने पोस्टमध्ये लिहिलं, “आई, एक वर्ष झालं. तुझ्याशिवाय आयुष्य आता पहिल्यासारखं राहिलेलं नाही. मला माफ कर. तुला थँक्यूही म्हणता आलं नाही.” तेजस्विनी पंडितच्या या पोस्टवर अनेक कलाकारांनी कमेंट करत ज्योती चांदेकर यांच्या आठवणींना उजाळा दिला आहे.



# अनन्या राजचे निधन

घोस्ट, 7 आवर्स टू गो आणि द फायनल एक्झिट यांसारख्या चित्रपटांमधून प्रेक्षकांच्या लक्षात राहिलेल्या अभिनेत्री अनन्या राज यांचे वयाच्या अवघ्या 27व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाची माहिती त्यांच्या कुटुंबीयांनी सोशल मीडियावर दिली आहे. या दुःखद बातमीमुळे मनोरंजन विश्वात हळहळ व्यक्त केली जात आहे. कुटुंबीयांनी दिलेल्या माहितीनुसार, 15 जुलैच्या सकाळी अनन्या यांचे झोपेतच निधन झाले. गेल्या वर्षभरापेक्षा अधिक काळ त्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याशी संबंधित समस्यांचा सामना करत होत्या. या अडचणींमधून बाहेर पडण्यासाठी त्यांनी खंबीरपणे प्रयत्न केले, अशी माहिती त्यांच्या कुटुंबीयांनी दिली आहे. अनन्या राज यांच्या अधिकृत इंस्टाग्राम अकाउंटवरून त्यांच्या कुटुंबीयांनी निधनाची माहिती शेअर केली. या पोस्टमध्ये त्यांनी अनन्याला श्रद्धांजली वाहताना चाहत्यांना आणि त्यांच्या जवळच्या व्यक्तींना या कठीण काळात कुटुंबाच्या गोपनीयतेचा आदर करण्याची विनंती केली. कुटुंबीयांनी सांगितले की, अनन्या गेल्या काही काळापासून अनेक शारीरिक आणि मानसिक अडचणींचा सामना करत होत्या. या परिस्थितीतही त्यांनी खंबीरपणे लढा दिला. कुटुंबीयांनी अनन्याचे वर्णन मजबूत इच्छाशक्ती असलेली आणि स्वतःच्या पद्धतीने आयुष्य जगणारी व्यक्ती म्हणून केले. त्यांच्या निधनानंतर कुटुंबीयांनी चाहत्यांना अनन्याच्या आत्म्याच्या शांतीसाठी प्रार्थना करण्याचे आवाहन केले आहे. तसेच सध्या कुटुंबासाठी हा अत्यंत कठीण काळ असल्याने माध्यमे आणि चाहत्यांनी त्यांच्या खासगीपणाचा आदर करावा, अशी विनंतीही करण्यात आली आहे.

# मृणाल-यशस्वी डेटिंगच्या चर्चेला ब्रेक!



बॉलीवूडमधील हॉट अँड सेक्सी अभिनेत्री म्हणून मृणाल ठाकूरची ओळख आहे. तिच्या आणि भारतीय क्रिकेटपटू यशस्वी जयस्वाल सध्या त्यांच्या कथित डेटिंगमुळे चर्चेत आहेत. मुंबईतील वांद्रे येथील एका कॅफेजवळ दोघांना एकत्र पाहिल्यानंतर सोशल मीडियावर एक व्हिडिओ व्हायरल झाला. यावरून त्यांच्या नात्याबद्दल चर्चेला सुरुवात झाली आहे. मात्र, मृणालने या गोष्टी नाकारताना नाराजी व्यक्त केली आहे.मृणाल ही यशस्वीपेक्षा सुमारे दहा वर्षांनी मोठी आहे. या व्हायरल व्हिडिओनंतर दोघांच्या नात्याबद्दल अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. उलट मृणालने स्वतः या अफवांवर प्रतिक्रिया देऊन परिस्थिती स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. तिने सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या दाव्यांवर लोकांना सांगितले की योग्य माहितीशिवाय अशा गोष्टी पसरवणे टाळावे. मृणाल आणि यशस्वी यांच्या कथित नात्याची चर्चा जुलैच्याअखेरीस सुरू झाली होती. सोशल मीडियावर एक व्हिडिओ वेगाने व्हायरल झाला, त्यात मृणाल मुंबईतील वांद्रे पश्चिम भागातील एका कॅफेतून बाहेर पडताना दिसली. या कॅफेमध्ये यशस्वीदेखील होता. काही सोशल मीडिया युझर्सनी तर याला दोघांच्या डेटिंगचा पुरावा म्हणायला सुरुवात केली. तथापि, त्यावेळी उपलब्ध माहितीमध्ये अशा कोणत्याही डेटची पुष्टी झाली नव्हती.व्हायरल क्लिपच्या आधारे सोशल मीडियावर असा दावा करण्यात आला की मृणाल आणि यशस्वी एकाच ठिकाणी पोहोचले होते आणि नंतर वेगवेगळ्या मार्गाने तिथून निघाले. याच गोष्टीने अफवांना आणखी बळ दिले. मात्र, काही सोशल मीडिया चर्चांमध्ये असाही दावा करण्यात आला की व्हायरल क्लिप वेगवेगळ्या व्हिडिओंना जोडून तयार करण्यात आली होती. त्यामुळे व्हिडिओला दोघांच्या नात्याचा ठोस पुरावा मानणे योग्य नव्हते.सतत सुरू असलेल्या या अफवांच्या दरम्यान मृणालने सोशल मीडियावर स्वतः खुलासा करताना नाराजी व्यक्त केली आणि लिहिले, ”ब्रो रिलॅक्स’. तिच्या प्रतिक्रियेचा अंदाज हे दर्शवतो की ती अशा चर्चांना गांभीर्याने घेत नाही. तिने सोशल मीडिया वापरकर्त्यांना पुष्टीशिवाय कोणाच्याही वैयक्तिक आयुष्याबद्दल निष्कर्ष काढणे टाळण्याचा संदेश दिला. तिने सांगितले की, सोशल मीडियाचा वापर केवळ सेलिब्रिटींच्या खाजगी आयुष्याबद्दल अफवा पसरवण्यासाठी करू नये. तरुणांनी महत्त्वाच्या आणि आवश्यक मुद्द्यांवर व्हिडिओ बनवले पाहिजेत. अशाप्रकारे, मृणालने डेटिंगच्या अटकळांना हवा देण्याऐवजी, संभाषणाला इतर गंभीर मुद्द्यांकडे वळवण्याचा प्रयत्न केला.

# रवींद्र जडेजाचा 'वर्ल्ड रेकॉर्ड'!

## कसोटीत ३५० विकेट्स घेणारा ठरला भारताचा पहिलाच डावखुरा फिरकीपटू

**महाईन्यूज | श्रीलंका**

**रवींद्र जडेजाने भारत आणि श्रीलंका यांच्यातील गॉल कसोटी सामन्यात महाविक्रम रचला आहे. रवींद्र जडेजाने या सामन्यात २ विकेट्स घेतल्या. पण दुसरी विकेट घेताच त्याने कसोटी इतिहासात आपलं नाव सोनेरी अक्षरांनी लिहिलं. टीम इंडियाच्या या दिग्गज अष्टपैलू खेळाडूने दिवसाच्या तिसऱ्या सत्रात केशरा नुवानथाला बाद करून अनेक महत्त्वाचे विक्रमच आपल्या नावावर केले नाहीत, तर भारतासाठी एक अभूतपूर्व विक्रमही प्रस्थापित केला असा टप्पा ज्यापर्यंत यापूर्वी इतर कोणत्याही भारतीयाला पोहोचता आले नव्हते.**

गॉल कसोटीपूर्वी रवींद्र जडेजाच्या नावे कसोटीत ३४८ विकेट्स होत्या. जडेजाने श्रीलंकेचा कर्णधार धनंजय डि सिल्वाला झेलबाद करत ३४९वी विकेट मिळवली. यानंतर जडेजाने या डावात ६७व्या षटकात केशराला झेलबाद करत ३५०वी विकेट मिळवली. श्रीलंकेकडून पदार्पण करणाऱ्या केशरा नुवानथाला बाद करून जडेजाने कसोटी क्रिकेटमध्ये ३५० विकेट्सचा टप्पा गाठला. हा टप्पा गाठणारा जडेजा पहिलाच भारतीय डावखुरा फिरकी गोलंदाज ठरला आहे; याआधी कोणत्याही भारतीय डावखुऱ्या फिरकी गोलंदाजाने ३०० विकेट्सचा टप्पाही गाठलेला नाही.

भारतासाठी सर्वाधिक विकेट्स घेणाऱ्या डावखुऱ्या फिरकी गोलंदाजांच्या यादीत त्यांच्यापाठोपाठ भारताचे माजी दिग्गज खेळाडू बिशन सिंग बेदी यांचा क्रमांक लागतो, ज्यांनी आपल्या कारकिर्दीत एकूण २६६ विकेट्स घेतल्या होत्या. तर जडेजा हा कसोटी क्रिकेटमध्ये ३५० विकेट्स घेणारा जगातील केवळ तिसराच डावखुरा फिरकी गोलंदाज ठरला आहे.

जडेजाने रंगना हेराथ आणि डॅनियल व्हेटोरी यांच्यासह या प्रतिष्ठित गटात स्थान मिळवलं आहे. डावखुऱ्या फिरकी गोलंदाजांमध्ये सर्वाधिक कसोटी विकेट्स घेण्याचा विक्रम श्रीलंकेच्या रंगना हेराथच्या नावावर आहे ज्याने ४३३ विकेट्स घेतल्या तर व्हेटोरीने ३६२ विकेट्स घेतल्या होत्या. या यादीत जडेजा तिसऱ्या स्थानावर आहे. या यादीतील पहिल्या पाच जणांमध्ये डेरेक अंडरवूड आणि तैजुल इस्लाम यांचाही समावेश आहे, ज्यांनी अनुक्रमे २९७ आणि २७१ विकेट्स आपल्या नावे केल्या होत्या.

३५० कसोटी विकेट्सचा टप्पा गाठणारा जडेजा भारताचा केवळ पाचवा गोलंदाज ठरला. त्याच्याआधी अनिल कुंबळे, रविचंद्रन अश्विन, कपिल देव आणि हरभजन सिंग यांनीच ही कामगिरी केली होती. भारतासाठी सर्वाधिक कसोटी विकेट्स घेण्याचा विक्रम अनिल कुंबळे यांच्या नावावर आहे. कुंबळेंनी आपल्या कारकिर्दीत ६१९ विकेट्स घेतल्या. त्यानंतर रविचंद्रन अश्विनचा क्रमांक लागतो, ज्याने ५३७ विकेट्स आपल्या नावे केला होता. भारताचे विश्वचषक विजेते माजी कर्णधार आणि दिग्गज अष्टपैलू खेळाडू कपिल देव यांनी ४३४ विकेट्स, तर हरभजन सिंगने ४१७ विकेट्स घेतल्या होत्या, आता या यादीत जडेजाचं नावही जोडलं गेलं आहे.

### कसोटीत सर्वाधिक विकेट्स घेणारे डावखुरे फिरकीपटू

रंगना हेरथ (श्रीलंका) – ४३३ विकेट्स
डॅनियल व्हेटोरी (न्यूझीलंड) – ३६२ विकेट्स
रवींद्र जडेजा (भारत) – ३५० विकेट्स
डेरेक अंडरवुड (इंग्लंड) – २९७ विकेट्स
तैजुल इस्लाम (बांगलादेश) – २७१ विकेट्स



# संजीव गोयंका यांच्या सुपर जायंट्सने पटकावली पहिली टी-२० ट्रॉफी!

**महाईन्यूज | इंग्लंड**

**मँचेस्टर सुपर जायंट्सने अखेर पहिल्यांदाच ‘द हंड्रेड’ स्पर्धेचं पुरुष गटातील विजेतेपद पटकावलं आहे. सलग दोनदा अपयश आल्यानंतर अखेरीस जोस बटलरच्या नेतृत्वाखाली सुपर जायंट्स फ्रँचायझीने टी-२० लीगमध्ये पहिलं जेतेपद आपल्या नावे केलं. १६ ऑगस्टला खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात मँचेस्टर सुपर जायंट्सने ट्रेंट रॉकेट्सचा ५ गडी राखून पराभव केला. संघाला विजेतेपद मिळवून देण्यात सलामीवीर टिम सायफर्टने महत्त्वाची भूमिका बजावली; तो केवळ अंतिम सामन्याचाच नव्हे, तर संपूर्ण स्पर्धेचाही ‘स्टार’ ठरला.**



शेवटच्या तीन चेंडूंवर तीन धावांची गरज असताना दोन चेंडू शिल्लक ठेवत मँचेस्टर सुपर जायंट्स संघाने अंतिम सामना जिंकत जेतेपदही पटकावलं. या स्पर्धेचा अंतिम सामना ट्रेंट रॉकेट्स आणि मँचेस्टर सुपर जायंट्स यांच्यात खेळला गेला. जोस बटलरच्या नेतृत्वाखाली सुपर जायंट्सने पहिल्यांदाच विजेतेपद पटकावण्यात यश मिळवलं.

‘द हंड्रेड’चा अंतिम सामना ट्रेंट रॉकेट्स आणि मँचेस्टर सुपर जायंट्स यांच्यात खेळला गेला. प्रथम फलंदाजी करताना, ट्रेंट रॉकेट्सने १०० चेंडूंमध्ये ८ गडी गमावून १५८ धावा केल्या; संघातील एकाही फलंदाजाला ५० धावांचा टप्पा गाठता आला नाही. एन्यूरिन डोनाल्डने १९ चेंडूंत ३८ धावांची उत्तम खेळी केली. त्यानंतर, मँचेस्टर सुपर जायंट्सने विजयाचे लक्ष्य गाठताना टिम सायफर्टने ३९ चेंडूंत ७२ धावांची धडाकेबाज खेळी केली. मात्र, त्यानंतर संघाची लय बिघडली.

संघाला शेवटच्या तीन चेंडूंवर तीन धावांची गरज होती आणि सामना अत्यंत चुरशीच्या वळणावर पोहोचला होता. तीन चेंडू शिल्लक असताना पहिल्या चेंडूवर लियाम डॉसनने षटकार मारून आपल्या संघाचा विजय निश्चित केला. ‘सुपर जायंट्स’ने टी-२० स्पर्धा जिंकण्याची ही पहिलीच वेळ आहे. हा आयपीएलमधील ‘एलएसजी’ (लखनऊ सुपर जायंट्स) हाच संघ आहे. जोस बटलर ‘मँचेस्टर सुपर जायंट्स’चे नेतृत्व करत होता आणि त्याने संघाला विजेतेपद मिळवून दिलं.

मँचेस्टर सुपर जायंट्सने २०२२ आणि २०२३ मध्ये उपविजेतेपद मिळवलं होतं आणि अगदी थोडक्यात जेतेपदाला मुकावं लागलं होतं, परंतु यंदा या संघाने अखेर तो दुष्काळ संपवण्यात यश मिळवलं आहे. जोस बटलरने यापूर्वी संघाला टी-२० विश्वचषक जिंकून दिला आहे आणि आता त्याने आणखी एक टी-२० लीगचं जेतेपद पटकावलं आहे.

स्मार्ट PCMC
महाईन्यूज
ePaper
epaper.mahaenews.com
। मंगळवार ।
दि. 18 ऑगस्ट 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# ट्रायोज-झूलेलाल टॉवर रस्त्याच्या प्रश्नाला गती!

## सहा महिन्यांत प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्याचे आश्वासन / भाजपा शहराध्यक्ष काटे यांच्या पुढाकाराने नागरिकांशी थेट संवाद





**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**ट्रायोज ते झूलेलाल टॉवर सोसायटी परिसरातील नागरिकांच्या दळणवळणाचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी भाजपा शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न (बापू) काटे यांच्या पुढाकाराने महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. नगरसेविका अनिता काटे आणि नगरसेविका कुंदाताई भिसे यांच्यासह स्थानिक नागरिक व सोसायटी प्रतिनिधींशी थेट संवाद साधत रस्त्याच्या सद्यस्थितीचा आढावा घेण्यात आला.**

पिंपळे सौदागर परिसरातील वाढती लोकसंख्या आणि वाहनांची वाढती वर्दळ लक्षात घेता ट्रायोज–झूलेलाल टॉवर रस्ता नागरिकांच्या दैनंदिन दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. मात्र, रस्त्याची अपुरी रुंदी, वाहतुकीची वाढती समस्या आणि कामातील विविध तांत्रिक व प्रशासकीय अडथळ्यांमुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

या बैठकीत नागरिकांनी आपल्या समस्या थेट शत्रुघ्न काटे यांच्यासमोर मांडल्या. नागरिकांच्या प्रश्नांची गांभीर्याने दखल घेत रस्त्याच्या रुंदीकरणासह आवश्यक विकासकामांना गती देण्यासाठी प्रशासनाच्या पातळीवर पाठपुरावा करण्याची ग्वाही देण्यात आली.

या प्रश्नासाठी नगरसेविका अनिता काटे यांनीही सक्रिय भूमिका घेत नागरिकांच्या अडचणी जाणून घेतल्या असून, रस्त्याच्या कामासाठी आवश्यक प्रशासकीय समन्वय आणि पाठपुरावा करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. नागरिकांना प्रत्यक्ष दिलासा मिळावा, यासाठी त्यांनी बैठकीत आपली भूमिका मांडली. नगरसेविका कुंदाताई भिसे यांनीही नागरिकांच्या समस्या जाणून घेत रस्त्याच्या विकासकामाला प्राधान्य देण्याची भूमिका मांडली.

> “ट्रायोज ते झूलेलाल टॉवर हा परिसरातील नागरिकांच्या दैनंदिन दळणवळणासाठी महत्त्वाचा रस्ता आहे. त्यामुळे या रस्त्याच्या रुंदीकरणाचा प्रश्न आता अधिक काळ प्रलंबित ठेवता येणार नाही. नागरिकांनी मांडलेल्या प्रत्येक समस्येची गांभीर्याने दखल घेतली असून, संबंधित विभागांशी समन्वय साधून सर्व तांत्रिक व प्रशासकीय अडथळे दूर करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. येत्या सहा महिन्यांत या रस्त्याच्या कामाला ठोस गती देऊन नागरिकांना प्रत्यक्ष दिलासा देण्याचा आमचा निर्धार आहे.”
>
> - शत्रुघ्न काटे, शहराध्यक्ष तथा नगरसेवक, भाजपा.

या बैठकीमुळे ट्रायोज–झूलेलाल टॉवर परिसरातील नागरिकांच्या रस्त्याच्या प्रश्नाला आता गती मिळण्याची अपेक्षा निर्माण झाली आहे. शत्रुघ्न काटे यांच्या नेतृत्वाखाली तसेच अनिता काटे आणि कुंदाताई भिसे यांच्या समन्वयातून रस्ता रुंदीकरण व विकासकामाचा प्रश्न मार्गी लागण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले आहे. बैठकीस स्थानिक नागरिक, सोसायटीचे पदाधिकारी व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ‘न्यू इंग्लिश मीडियम स्कूल’चा अन्वय सामग बॅडमिंटन स्पर्धेत दुहेरी सुवर्णपदकाचा धनी!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**स्थानिक ‘न्यू ENGLISH MEDIUM SCHOOL’ चा इयत्ता ९ वी मधील गुणवंत खेळाडू अन्वय सामग याने जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत अष्टपैलू कामगिरी करत दुहेरी सुवर्णपदकावर (DOUBLE GOLD MEDAL) आपले नाव कोरले आहे.**

’अर्बन जेट्स योनेक्स-सनराईज W18 इंडिपेंडन्स कप डिस्ट्रिक्ट सुपर १०० रँकिंग बॅडमिंटन टूर्नामेंट २०२६’ या नुकत्याच पार पडलेल्या स्पर्धेत अन्वयने १५ वर्षांखालील (U15) गटात आपल्या वेगवान हालचाली आणि अचूक फटक्यांच्या जोरावर संपूर्ण वर्चस्व गाजवले.

अन्वयचे दैदिप्यमान यश:



U15 मुले एकेरी (SINGLES): अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या अंतिम सामन्यात प्रतिस्पर्ध्याला नमवत अन्वयने पहिले सुवर्णपदक पटकावले.

U15 मुले दुहेरी (BOYS DOUBLES): दुहेरीच्या अंतिम सामन्यातही चमकदार कामगिरीचे प्रदर्शन करत त्याने दुसरे सुवर्णपदक आपल्या नावावर केले.

एकाच स्पर्धेत दोन सुवर्णपदके मिळवून अन्वयने शाळेच्या व संपूर्ण थेरगाव परिसराच्या लौकिकात मोलाची भर घातली आहे. त्याच्या या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन विजय पवार, मुख्याध्यापिका विद्या नाईक, क्रीडा शिक्षक, सर्व शिक्षकवृंद आणि व्यवस्थापनाने त्याचे विशेष कौतुक करून पुढील क्रीडा प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या.

> “अन्वयने मिळवलेले दुहेरी सुवर्णपदक हे त्याच्या कठोर परिश्रम आणि जिद्दीचे फळ आहे. त्याचा हा विजय शाळेतील इतर सर्व विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल. क्रीडा क्षेत्रात अन्वय असाच उत्तरोत्तर उज्ज्वल यश संपादन करत राहो, हीच शुभेच्छा!”
>
> - विजय पवार, चेअरमन, न्यू इंग्लिश मीडियम स्कूल, थेरगाव.

# नूतन अभियांत्रिकी महाविद्यालयात १५ ऑगस्ट उत्साहात

## मावळच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या उल्लेखनीय यशाचे कौतुक

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**नूतन महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीमध्ये भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिन देशभक्तीपूर्ण आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास विप्रो टेक्नॉलॉजीचे माजी जनरल मॅनेजर व माजी ग्लोबल प्लेसमेंट हेड सतीश रानडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.**

### रुद्रा राजगुरे, राम पंडित खापे यांचा विशेष सत्कार

यावेळी नासा आणि इस्रो भेटीसाठी थेट निवड झालेल्या मावळ तालुक्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थी रुद्रा राजगुरे आणि राम पंडित खापे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे मावळ तालुक्याचे नाव देश-विदेशात उज्ज्वल झाले असून, संस्थेच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले.



यावेळी संस्थेचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री संजय (बाळा) भेगडे, उपाध्यक्ष नंदकुमार शेलार, सल्लागार महेशभाई शहा, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे संचालक डॉ. प्रमोद पाटील, सीईओ डॉ. रामचंद्र जहागीरदार यांच्यासह शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

सतीश रानडे यांनी मार्गदर्शन करताना स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे व बलिदानाचे स्मरण करून विद्यार्थ्यांनी देशाच्या विकासासाठी ज्ञान, कौशल्य आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करावा, असे आवाहन केले. बदलत्या औद्योगिक क्षेत्राच्या गरजा लक्षात घेऊन विद्यार्थ्यांनी अद्ययावत कौशल्ये आत्मसात करावीत आणि आत्मनिर्भर भारताच्या निर्मितीत योगदान द्यावे, असे त्यांनी सांगितले.

संस्थेचे अध्यक्ष संजय (बाळा) भेगडे यांनी स्वातंत्र्य दिन हा देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या वीरांना अभिवादन करण्याचा दिवस असल्याचे नमूद केले. विद्यार्थ्यांनी राष्ट्रप्रेम, शिस्त, सामाजिक बांधिलकी आणि नैतिक मूल्ये जपत देशाच्या प्रगतीसाठी जबाबदार नागरिक म्हणून योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

संचालक डॉ. प्रमोद पाटील यांनी उपस्थित मान्यवर, शिक्षकवृंद, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे स्वागत करून स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. स्वातंत्र्याचे महत्त्व जपत राष्ट्राच्या विकासासाठी प्रत्येकाने आपले योगदान द्यावे, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. तेजस्विता काजळे आणि विद्यार्थी देवदत्त दीक्षित यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन निबंधक विजय शिर्के, डॉ. शहुराज साबळे, डॉ. अनुज खोंड, प्रा. नेहा भागवत, सौ. प्रीती घुले, प्रा. नूतन पाटील आणि प्रा. धीरज पाटील यांनी केले.

# सोसायटी कारभारात पारदर्शकतेसाठी डॉ. सुहास कांबळे यांचा अभिनव उपक्रम

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**सोसायट्यांचा कारभार अधिक पारदर्शक, सुलभ आणि आधुनिक करण्यासाठी नगरसेवक डॉ. सुहास कांबळे यांनी अभिनव डिजिटल उपक्रम हाती घेतला आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त सेक्टर १२ मधील सर्व सोसायट्यांना कोणतेही शुल्क न आकारता 'सोसायटी मॅनेजर' अॅप उपलब्ध करून देण्यात येणार आहे.**



या अॅपच्या विकासाचे काम ५ जुलैपासून सुरू करण्यात आले होते. अवघ्या काही आठवड्यांत अॅप तयार करून १५ ऑगस्ट रोजी रत्नदुर्ग सोसायटीमध्ये नगरसेवक डॉ. सुहास कांबळे यांच्या हस्ते त्याचे लोकार्पण करण्यात आले. टप्प्याटप्प्याने सेक्टर १२ मधील इतर सोसायट्यांनाही हे अॅप उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या अॅपद्वारे सभासदांना मेंटेनन्स बिल मोबाईलवर पाहता येणार असून, ऑनलाइन बिल भरल्यानंतर तत्काळ डिजिटल पावती मिळणार आहे. सोसायटीच्या नोटिसा, सूचना आणि महत्त्वाची माहितीही अॅपवर उपलब्ध होणार आहे.

तसेच अध्यक्ष, सचिव आणि मॅनेजर यांना सोसायटीच्या जमा रकमेची व खर्चाची नोंद डिजिटल पद्धतीने करता येणार असून, त्यावर आधारित ऑटोमॅटिक बॅलन्स शीट उपलब्ध होणार आहे. त्यामुळे सोसायटीचे अकाउंटिंग अधिक व्यवस्थित आणि पारदर्शक होण्यास मदत होणार आहे.

रत्नदुर्ग सोसायटीतील लोकार्पण कार्यक्रमात अॅपच्या सुविधांचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. फ्लॅट क्रमांक १०१ चे सभासद अमर दत्ता यांच्या मोबाईलमध्ये अॅप डाउनलोड करून ऑनलाइन पावती काढून दाखवण्यात आली.

या प्रसंगी बी टाईप फेडरेशनचे अध्यक्ष बाबाजी कळमकर यांनी डॉ. सुहास कांबळे यांचा सत्कार केला. कार्यक्रमासाठी रत्नदुर्ग सोसायटीचे अध्यक्ष कैलास भुजबळ, सचिव राजेंद्र घाडगे, खजिनदार अबुसुफियान अत्तार यांच्यासह गणेश जाधव, विशाल लांबे, धनाजी पाटील, निलेश कडू, राजेंद्र तागड, श्रावण गुंजाळ आणि अनिल पवार यांनी विशेष परिश्रम घेतले. सोसायटी व्यवस्थापनात डिजिटल प्रणालीचा वापर वाढवून पारदर्शकता आणि सुलभता निर्माण करणारा हा उपक्रम सेक्टर १२ मधील सोसायट्यांसाठी निश्चितच उपयुक्त ठरणार आहे.

### भावनिक आठवणींना उजाळा

नगरसेवक डॉ. सुहास कांबळे यांनी रत्नदुर्ग सोसायटीशी असलेल्या जिव्हाळ्याच्या आठवणींना उजाळा देत, महानगरपालिका निवडणुकीत विजयी झाल्यानंतर पहिला पेढ्याचा बॉक्स याच सोसायटीत दिल्याचे सांगितले. यनिमित्ताने नागरिकांशी असलेला जिव्हाळा पुढील काळात अधिक दृढ करण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला.

> सोसायटीचा कारभार हा प्रत्येक सभासदासाठी पारदर्शक, सुलभ आणि विश्वासार्ह असला पाहिजे, हा माझा कायम प्रयत्न आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सोसायट्यांचे अकाउंटिंग, मेंटेनन्स आणि दैनंदिन व्यवस्थापन अधिक सोपे व्हावे, यासाठी 'सोसायटी मॅनेजर' अॅप उपलब्ध करून देत आहोत. सेक्टर १२ मधील प्रत्येक सोसायटीला याचा विनामूल्य लाभ मिळावा आणि सभासदांचा वेळ वाचून कारभारात अधिक पारदर्शकता यावी, हेच या उपक्रमामागचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील राहणार आहे.
>
> **- डॉ. सुहास कांबळे**, नगरसेवक, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.

# SPG इंटरनॅशनल पब्लिक स्कूलमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात

## देशभक्तीपर वातावरणात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण

**महाईन्यूज** | पिंपरी- चिंचवड

**एसपीजी इंटरनॅशनल पब्लिक स्कूलमध्ये १५ ऑगस्ट २०२६ रोजी भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिन अत्यंत उत्साहपूर्ण, देशभक्तीमय आणि दिमाखदार वातावरणात साजरा करण्यात आला. विविध सांस्कृतिक कार्यक्रम, शिस्तबद्ध परेड, नृत्य सादरीकरण तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव यामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.**



कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक सागर बाळासाहेब गवळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान पांडुरंग नाना गवळी आणि सुनीता पांडुरंग नाना गवळी यांनी भूषविले. स्वप्नील पांडुरंग गवळी, कोमल स्वप्नील गवळी आणि संकल्प पांडुरंग गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी स्कूलचे प्राचार्य प्रवीण गायकवाड, सुप्रिया मुळे आणि तैसीन मुलाणी यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच कॉलेजचे व्यवस्थापन, रेहान सर, जयश्री सुरवसे, वैशाली यादव आणि कॉलेजमधील सर्व शिक्षकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

इयत्ता पाचवी आणि सातवीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले नृत्य, परेड आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. रुपाली ससाणे, विकी सर, प्रेमलता मॅडम आणि भावना मॅडम यांनी विद्यार्थ्यांची उत्कृष्ट तयारी करून घेतली. कॉलेजच्या प्राचार्या वैशाली यादव यांनी केलेले प्रेरणादायी भाषण विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक ठरले. मनीषा चव्हाण आणि अश्विनी मांजरेकर यांनी प्रभावी सूत्रसंचालन केले.

कार्यक्रमासाठी करण्यात आलेली आकर्षक सजावटही विशेष लक्षवेधी ठरली. सजावटीसाठी मेहनत घेणाऱ्या सर्व शिक्षकांचे कौतुक करण्यात आले.

### शिस्तबद्ध परेडने वेधले लक्ष

विकी सर आणि सोहम सर यांच्या नियोजनातून विद्यार्थ्यांची शिस्तबद्ध परेड साकारण्यात आली. विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने आणि देशभक्तीच्या भावनेने सादर केलेल्या परेडला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली.

विशेषतः एकता जाधव आणि निशा वाघमारे यांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांचे विशेष आभार मानण्यात आले.

शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, कॉलेजचे शिक्षक, व्यवस्थापन आणि विद्यार्थ्यांनी एकजुटीने केलेल्या प्रयत्नांमुळे स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम शिस्तबद्ध, उत्साहपूर्ण आणि संस्मरणीय ठरला, अशी माहिती तैसीन मुलाणी यांनी दिली.

### गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये इयत्ता दहावी आणि बारावीमध्ये ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा ट्रॉफी देऊन गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट शैक्षणिक कामगिरीचे कौतुक करून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून उत्कृष्ट निकालासाठी योगदान देणाऱ्या शिक्षकांचाही ट्रॉफी देऊन सत्कार करण्यात आला. शिक्षकांच्या मेहनतीचे, मार्गदर्शनाचे आणि समर्पणाचे यावेळी विशेष कौतुक करण्यात आले.

# देहूतील संत जिजाबाई कन्या विद्यालयात सायबर सुरक्षा जनजागृती

**महाईन्यूज** | पिंपरी- चिंचवड

**डिजिटल तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि त्यासोबत वाढणाऱ्या ऑनलाइन फसवणुकीच्या घटना लक्षात घेता विद्यार्थिनींमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने संत जिजाबाई कन्या विद्यालय, देहू येथे सायबर सुरक्षा जनजागृती सत्र उत्साहात पार पडले. क्विक हील फाउंडेशनच्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' अभियानांतर्गत आयोजित या उपक्रमाला विद्यार्थिनी व शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.**



या सत्रात विद्यार्थिनींना ओटीपी फसवणूक, मजबूत संकेतशब्द, संशयास्पद लिंक, मोबाईल ॲपच्या परवानग्या, वैयक्तिक माहितीची सुरक्षितता तसेच ऑनलाइन फसवणुकीपासून बचावाचे उपाय याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. डिजिटल माध्यमांचा वापर करताना कोणती खबरदारी घ्यावी, यासाठी प्रत्यक्ष जीवनातील सायबर फसवणुकीच्या घटनांची उदाहरणेही देण्यात आली.

विद्यार्थिनींनी अनोळखी व्यक्तींशी ओटीपी, संकेतशब्द किंवा वैयक्तिक माहिती शेअर करू नये, प्रत्येक ऑनलाइन खात्यासाठी वेगळा व मजबूत संकेतशब्द वापरावा आणि अनोळखी लिंकवर क्लिक करण्यापूर्वी तिची सत्यता तपासावी, असे आवाहन करण्यात आले. तसेच मोबाईल ॲप्सना केवळ आवश्यक तेवढ्याच परवानग्या द्याव्यात आणि अनावश्यक परवानग्या टाळाव्यात, याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. सायबर फसवणूक झाल्यास घाबरून न जाता तातडीने राष्ट्रीय सायबर गुन्हे हेल्पलाईन क्रमांक १९३० वर संपर्क साधावा तसेच सायबरक्राइम डॉट जीओव्ही डॉट इन या अधिकृत संकेतस्थळावर तक्रार नोंदवावी, अशी महत्त्वपूर्ण माहिती विद्यार्थिनींना देण्यात आली. या सत्राचे मार्गदर्शन गायत्री पाटील आणि माधुरी पाटील यांनी केले. प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून विद्यार्थिनींच्या शंकांचे निरसन करण्यात आले. संवादात्मक पद्धतीने झालेल्या या मार्गदर्शनामुळे विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत डिजिटल सुरक्षेच्या विविध पैलूंची माहिती घेतली.

### क्विक हील फाउंडेशनच्या प्रेरणेतून उपक्रम

हा उपक्रम एमआयटी एसीएससी, आळंदी यांच्या सहकार्याने आणि क्विक हील फाउंडेशनच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. क्विक हील फाउंडेशनच्या अध्यक्षा सौ. अनुपमा काटकर तसेच सहयोगी संचालक श्री. अजय शिर्के यांच्या प्रेरणेतून विविध शाळांमध्ये सायबर सुरक्षा जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहेत. एमआयटी एसीएससी, आळंदीचे प्राध्यापक समन्वयक श्री. अमित तळे यांचेही या उपक्रमाला मार्गदर्शन लाभत आहे. 'माझा डेटा, माझी जबाबदारी' हा संदेश देत विद्यार्थिनींनी सुरक्षित, सजग आणि जबाबदार डिजिटल नागरिक बनण्याचा निर्धार व्यक्त केला. बदलत्या डिजिटल युगात विद्यार्थिनींना तंत्रज्ञानासोबतच सायबर सुरक्षेचे ज्ञान देणे आवश्यक असून, अशा जनजागृतीपर उपक्रमांमुळे सुरक्षित डिजिटल समाजनिर्मितीला निश्चितच हातभार लागेल, असे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

# संत साई शाळेत स्वातंत्र्यदिन सोहळा उत्साहात

## राष्ट्र उभारणीसाठी क्रांती’ संकल्पनेतून विद्यार्थ्यांचा देशभक्तीचा जागर

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**संत साई इंग्लिश मीडियम हायस्कूल, भोसरी येथे भारताचा ८०वा स्वातंत्र्यदिन देशभक्तीपूर्ण वातावरणात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ‘राष्ट्र उभारणीसाठी क्रांती’ या संकल्पनेखाली आयोजित करण्यात आलेल्या शाळेच्या २५व्या क्रांती सप्ताहाचा रौप्य महोत्सवी सांगता समारंभही यावेळी उत्साहात पार पडला.**



### ‘जयोस्तुते श्रीमहन्मंगले...’ गीताला दाद...

शाळेची माजी विद्यार्थिनी ऋतुजा बंदेलू हिने ‘जयोस्तुते श्रीमहन्मंगले...’ हे देशभक्तिपर गीत सादर केले. तिच्या सुरेल सादरीकरणाला उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहनानुसार विद्यार्थी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी ‘ड्रग्जला ना म्हणा’ ही प्रतिज्ञा घेतली. अमली पदार्थांच्या दुष्परिणामांविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण करून निरोगी, जबाबदार आणि सकारात्मक जीवनशैली स्वीकारण्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ७.३० वाजता भारतमातेचे पूजन, दीपप्रज्वलन आणि क्रांतीज्योत प्रज्वलित करून करण्यात आली. मुख्याध्यापक शिवलिंग ढवळेश्वर आणि प्रमुख पाहुणे सुभेदार (निवृत्त) सुनील निकम यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकविण्यात आला. त्यानंतर राष्ट्रगीताच्या सामूहिक गायनाने संपूर्ण परिसर देशभक्तीच्या भावनेने भारावून गेला.

प्रमुख पाहुणे सुनील निकम यांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. आपल्या प्रेरणादायी मार्गदर्शनात त्यांनी विद्यार्थ्यांना शिस्त, समर्पण, धैर्य, देशभक्ती आणि राष्ट्राप्रती कर्तव्यभावनेचे महत्त्व पटवून दिले. सैन्यातील अनुभव कथन करताना त्यांनी विद्यार्थ्यांनी जीवनात ध्येय निश्चित करून देशासाठी जबाबदार आणि कर्तव्यनिष्ठ नागरिक बनावे, असे आवाहन केले.

यावेळी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे आणि शैक्षणिक गुणवत्तेचे कौतुक करत त्यांना भविष्यातही सातत्याने प्रगती करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले.

२५व्या क्रांती सप्ताहाच्या सांगता समारंभात विद्यार्थ्यांनी गीत, कविता, संवाद आणि विविध सांस्कृतिक सादरीकरणांच्या माध्यमातून देशभक्ती आणि राष्ट्रनिर्मितीचा संदेश दिला. स्वच्छता, एकता, जबाबदारी, आदर, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्र उभारणी यांसारख्या महत्त्वाच्या मूल्यांवर आधारित सादरीकरणांनी उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमात विशेष पालक संवादाचेही आयोजन करण्यात आले. गुणवंत विद्यार्थ्यांच्या पालक स्मिता निकराड यांनी विद्यार्थ्यांच्या अभ्यासातील एकाग्रता, शिस्त आणि सकारात्मक दृष्टिकोनाबाबत आपले अनुभव मांडले. त्यांच्या मनोगतामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासाच्या चांगल्या सवयी अंगीकारून शैक्षणिक ध्येयासाठी सातत्याने प्रयत्न करण्याची प्रेरणा मिळाली.

वाजिदा मलिक यांनी स्वातंत्र्यदिनाचे महत्त्व आणि सशक्त व प्रगतिशील राष्ट्र घडविण्यात विद्यार्थ्यांची भूमिका यावर प्रेरणादायी मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक शिवलिंग ढवळेश्वर आणि सुनील निकम यांनीही विद्यार्थ्यांना समाजासाठी सकारात्मक योगदान देणारे जबाबदार नागरिक बनण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या सांगतेवेळी प्रमुख पाहुणे, शाळा व्यवस्थापन, मुख्याध्यापक, शिक्षक, पालक, विद्यार्थी, माजी विद्यार्थी आणि कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी योगदान देणाऱ्या सर्वांचे आभार मानण्यात आले. ‘वंदे मातरम्’च्या जयघोषाने कार्यक्रमाची सांगता झाली.

देशभक्ती, कृतज्ञता, गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव, सामाजिक जागृती आणि राष्ट्रनिर्मितीचा संदेश यांचा सुंदर संगम ठरलेला हा स्वातंत्र्यदिन सोहळा संस्मरणीय ठरला. ‘खरी राष्ट्रउभारणी ही आपल्यातील सकारात्मक बदलापासून सुरू होते’ हा संदेश देत संत साई शाळेच्या २५व्या क्रांती सप्ताहाचा रौप्य महोत्सवी अध्याय उत्साहात पूर्ण झाला. या सोहळ्यास मोठ्या संख्येने पालक, पालक-शिक्षक संघाचे (PTA) सदस्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि माजी विद्यार्थी उपस्थित होते.

# National Librarian Day Celebrated with Enthusiasm at Priyadarshani School, Moshi

**MahaEnews । PIMPRI-CHINCHWAD**

**Priyadarshani School, Moshi celebrated National Librarian Day with great enthusiasm, highlighting the importance of reading and the significant role of books and libraries in shaping young minds.**



As part of the celebration, the school organised an engaging Book Exhibition on the school premises. The exhibition featured a diverse collection of books catering to students of different age groups and interests. The collection included literature, science, general knowledge, biographies, stories and several other subjects.

The initiative was aimed at encouraging students to develop a strong reading habit and discover the joy of exploring the world through books. Students enthusiastically browsed through the collection and showed keen interest in selecting books according to their interests.

A large number of students and parents visited the exhibition, making the event a meaningful success. The exhibition received an overwhelming response, with parents appreciating the school's efforts to cultivate reading habits, intellectual curiosity and a love for learning among children.

The celebration also underlined the importance of libraries as vibrant centres of knowledge and learning. By providing students with access to a wide range of books, the school sought to inspire them to read beyond their textbooks and broaden their knowledge and imagination.

The school management and the Principals appreciated the sincere efforts of the entire team involved in organising the exhibition. They expressed their appreciation for making the initiative engaging, educational and meaningful for students.

The successful celebration of National Librarian Day at Priyadarshani School, Moshi reflected the school's continued commitment to nurturing well-read, curious and intellectually empowered young minds.

DTE Code 6310

Approved by AICTE | Accredited by NAAC | Accredited by NBA

PCET- NUTAN

# Nutan Maharashtra Institute of Engineering and Technology

Autonomous Institute | SPPU Affiliated

## Admissions Open for Academic Year 2026–27

| Degree | Programme Name | Choice Code | Intake |
|---|---|---|---|
| B.Tech | Computer Engineering (CE) | 631024510 | 240 |
| B.Tech | Computer Science Engineering (CSE) | 631024210 | 180 |
| B.Tech | Artificial Intelligence & Data Science (AI&DS) | 631099510 | 120 |
| B.Tech | Information Techanology (IT) | 631024610 | 120 |
| B.Tech | CSE Artificial Intelligence (CSE AI) | 631091310 | 60 |
| B.Tech | Electronics and Telecommunication (E&TC) | 631037210 | 120 |
| B.Tech | Mechanical Engineering | 631061210 | 120 |
| B.Tech | Electronics & Computer Engineering | 631084410 | 120 |
| M.Tech | Computer Engineering (CE) | 0631024510 | 12 |
| M.Tech | E&TC (IoT & Sensor System) | 0631095210 | 12 |
| BCA | Bachelor of Computer Applications (BCA) | 0631010110 | 120 |
| MBA | Master of Business Administration (MBA) | 0631010110 | 120 |
| MCA | Master in Computer Application (MCA) | 0631010110 | 120 |
| LL.B. | Bachelor of Laws | 26031 | 60 |
| B.Sc | Cyber and Digital Science (B.Sc) | - | 60 |
| B.Voc. | Bachelor of Vocation (B.Voc.) | - | 180 |

Highest Package for PCET-Nutan
**61 Lakh P.A.**

Average Salary Package
**5.5 Lakh P.A.**

For Admissions Contact:
**8830992988 / 7423080910 / 9028101155**



Scan the QR Code Today to Get More Information

Samarth Vidya Sankul, Vishnupuri, Talegaon Dabhade, Pune – 410507